# ट्राम प्रकल्प पुण्याला लाभदायक आहे काय? ०९ ऑगष्ट २००५

ट्राम प्रकल्पा बाबत प्रशासन व जनता या मध्ये उलट सुलट मते आहेत. या मध्ये मुख्य मुद्दा बाजूला पडत आहे. नागरिकाना फक्त सार्वजनिक प्रवास व्यवस्था हवी आहे असा सूर त्यातून निघतो. हे अजिबात खरे नाही. पाणी, वीज, रस्ते, मलनिस्सारण, स्वच्छता अशा किती तरी अनेक सेवा नागरिकाना हव्या आहेत. या सर्व सेवा पुरवण्यास निधी लागतो. निधी अमर्याद नसतो. तरी पण सर्व सेवा हव्या असतात. त्यातून मार्ग काढणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. प्रशासनाने नागरिकांची मते जाणून व निधीच्या उपलब्धेनुसार अग्रकम ठरविला पाहिजे व नागरिकाना विश्वासात घेऊन सिद्ध केला पाहिजे. प्रत्येक कामा करता किती निधी उपलब्ध होऊ शकतो त्याचे अंदाज पत्रक जनते पुढे मांडले पाहिजेत. सर्वकष अंदाज पत्रक जनतेला माहित झाले तर नागरिकाना आपल्याला कोठली गोष्ट केंव्हा मिळेल हे समजू शकेल. आक्षेप नोंदवता येतील. तद् नंतर अग्रक्रम जरूरी प्रमाणे बदलता येतील.

नागरिक समोर दिसणारा मुद्दा अटीतटीचा करतात. मग तो पाण्याचा असो किंवा हेल्मेट सक्तीचा किंवा सध्याचा रस्त्याचा. प्रशासनाने लोकप्रियते करता आश्वासने न देता नागरिकाना परिस्थितीची जाणीव करून द्यावी. लगेच एक वर्षात रस्ते चकाचक करण्याचे आश्वासन देऊ नये. अर्थात हे होईलच याची शाश्वती नाही. पण समजा करावयाचे ठरवलेच व केलेच तर त्यामुळे बाकी सेवावर काय परीणाम होईल हे कोणीच सांगत नाही. प्रशासनाने जर सांगितले कीं, 'आम्ही अमुक रस्ता, अमुक वेळात सर्वोत्तम करतो व सिद्ध करतो कीं, पुण्यात हे काम कोठल्याही रस्त्यावर करू शकतो' तर ते पटण्या सारखे आहे. काम केल्यावर खर्चाचा हिशेब द्या व जलतेला विचारा 'बाकी रस्ते करू का?' जनतेला बाकी रस्त्याबाबत ठरवू द्या. घाई गर्दीत काम करून वारेमाप खर्च करू नका. उद्या चांगले केलेले रस्ते विसरेल व दुसरा मुद्दा घेऊन रस्त्यावर उतरेल. रस्ते चांगले केले म्हणून जनतेला गप्प करता येणार नाही. जनतेला सर्वच सेवा दिल्या पाहिजेत. केंव्हा व कशा हे जनतेला विश्वासात घेऊन सांगा.

वाहन व्यवस्थे बाबतही असाच दृष्टीकोण असण्याची गरज आहे. सार्वजनिक वाहन व्यवस्थेचे अनेक पर्याय आहेत. सर्व पर्याय नागरिकांच्या समोर ठेवा. प्रत्येक पर्ययाचा खर्च, लागणारा वेळ, त्याचे फायदे, तोटे, अडचणी हे सर्व नागरिकाना सांगा. नागरिकांची मते ध्यानात घ्या व मग निर्णय करा. निर्णय झालेवर झपाट्याने पूर्ण करा.

बस व लोकल ट्रेन ही एक मळलेली वाट आहे. कित्येक वर्षे मुंबई व पुण्यात तसेच इतर शहरात वापरात आहे. हा पर्यायही विचारात घ्यावा. माननीय सुरेश कलमाडी यांच्या प्रयत्नाने पुणे-नाशिक मार्गाला मंजुरी मिळाली परंतु, निधी अभावी कामाला सुरवात झाली नाही. यातील आकुर्डी-आळंदी मार्गाचे काम करण्यास शासनाला उद्युक्त करता येईल. तो मार्ग पुढे लोणी पर्यंत नेता येऊ शकतो. असा चौपदरी मार्ग झाला तर सध्याचा मार्ग लोकल ट्रेन करता पूर्पणे वापरता येईल. दर १०-१५ मिनटानी लोणी ते आकुर्डी लोकल ट्रेन धावू शकेल. नवीन मार्गावरही सोईप्रमाणे लोकल ट्रेन धावू शकेल. सध्याच्या रेल्वे मार्गाला आडवे छेद देणारे रस्ते सक्षम करता येतील. त्यावर बस व्यवस्था कार्यक्षम करता येईल. यामध्ये मुख्य फायदा पुणे व पिम्प्री-चिंचवड महापालिकाना कांहीही खर्च करावा लागणार नाही. रेल्वे मार्ग लवकर होण्या करता दोन्ही महानगरपालिका भूसंपादनात मदत करू शकतील. त्याचा कांही भार उचलू शकतील. उदाहणार्थ आकुर्डी, भोसरी, वाघोली, लोणी येथील रेल्वे स्टेशन करता लागणारी जमीन संपादून विनामोबदला रेल्वेकडे हस्तांतरीत करणे. यामध्ये एक अडचण हाऊ शकते. नागरिकाना लांब अंतराच्या गाड्या करता आकुर्डी अगर लोणीला जावे लागेल. परंतु, ही अडचण फार मोठी नाही. पुण्याहून दर १०-१५ मिनटानी लोकल ट्रेनची व्यवस्था झाली तर आकुर्डी लोणीला पोहचणे अवघड असणार नाही. समतोल दृष्टीकोणातून विचार करण्या सारखा हा प्रस्ताव आहे. ट्राम प्रस्ताव यापेक्षा स्वस्त व जास्त नागरिकाना सोईचा असेल तर याचा विचार करण्याची गरज नाही.

वरील पर्यायाचा विचार करताना राज्य परिवाहन मंडळाच्या स्थानकांचाही विचार व्हावा. सर्व स्थानके कात्रज, आकुर्डी, भोसरी, वाघोली, लोणी, हडपसर येथे न्यावीत. पुणे पिम्प्री-चिंचवड परिसरातील स्थानका दरम्यान वाहतूकीस राज्यपरिवाहन मंडळास परवानगी द्यावी, परंतु त्यांच्या लांब पल्ल्याच्या सर्व गाड्या शहराबाहेरूनच जाव्यात.

वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने किती तरी मुद्दे आहेत. नागरिकांची मते मागवली तर सर्व मुद्यांचा विचार होईल व एक फलदाई व्यवस्था अवतरेल.